# " जिद्द "

सौ. रमा (वसु) गोपाळ परांजपे.
६६८/ मंगळवारपेठ
सातारा मो. ९८५००७८९२६

आज "उत्सव मंगल कार्यालयाचे" उद्घाटन होते. कुलकर्णी मंडळी खूप गडबडीत होती. कार्यालय खूप मोठे आणि सर्व सोयींनीयुक्त असे बांधले होते. रोषणाई छान केलीहोती. सनईच्या सुराने कान अगदी मंत्रमुग्ध झाले होते.

उद्घाटन सोहळा प्रसिद्ध उद्योगपति श्री आनंद देशपांडे यांच्याहस्ते संपन्न होणार होता. दहावाजता कार्यक्रम सुरु होणार होता. प्रत्येजण पाहुण्यांची वाट पहात होते. तेवढ्यात कोणीतरी म्हटले, अहो दहा वाजले, अजुनकसा पाहुण्यांचा पत्ता नाही. लगेचमागुन उत्तर आले, अहो तुमचे घड्याळपुढे असेल तुम्ही त्यांच्या आउणावर जाउनका, आम्ही ते आले की घड्याळ लावतो.

तेवढ्यात एकच गोंधळ उडाला. कोणी म्हणत होते पाहुणे आले, कोणीम्हणत होत साहेब आले, तर कोणी आनंद आला. पाहुणे म्हणजेलोकांच्या डोळ्यासमोर एकवेगळीच प्रतिमा होती, पण एक उंचीपुरी, पण अगदी साधी व्यक्ती. सर्वांना आश्चर्य वाटले. एवढा मोठा माणुस पण रहाणीमान किती साधे.

कार्यक्रम सुरु झाला. फित कापण्यासाठी पाहुण्याच्या हातात कात्री दिली, ती त्यांनी घेतलीव ते स्टेजवरुन खालीउतरले. त्यांचे गुरुजी श्री साने जवळच बसलेहोते. त्यांना घेउन ते स्टेजवर आले. गुरुजींना दिसतहीकमीहोत, ऐकुही कमीयेतहोत. सर्वांना काय चालले हे कळायच्याआत गुरुजींचां हात धरुन फित कापली. त्यानंतर गुरुजींनां खाली वाकून नमस्कार केला. गुरुजींना त्यांच्याजागेवर बसविले. टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. पाहुण्यांनी चार शब्द बोलावे असा सर्वांचा आग्रह झाला.

बोलायला उभे राहिल्यावर पुन्हा टाळ्यांचा कडकडाट झाला. प्रथम तुम्ही मला उद्घाटनाला बोलावीलेत पण मी गुरुजींनां घेउन स्टेजवर आलो त्याबद्दल क्षमस्व. मला असा मोठेपणा घ्यायला आवडत नाही, तेवढीमाझी पातताहिनहि. सागर माझ्या मित्राचा मुलगा. लहान वयात त्यांने एवढेमोठे पाउल उचलले आहे. त्याचं कौतुक म्हणुन मी आलो आहे. आपल्या गावात कितीतरी वृद्धव्यक्ती आहेत. त्यांनाजर आपण हा मान दिला तर त्यांना खूप आनंद वाटेल.

—x—

1

त्याच्या आशिर्वादामुळेच तर आपण हा आजचा दिवस पाहू शकलो. आजपासुन गावात कोणताही कार्यक्रम असू देत कोणत्याही नेत्यास किंवा बाहेरच्या व्यक्तिस न बोलविता आपण गावातल्याच वडिलधाऱ्या व्यक्तिच्या हातूनच कार्यक्रमाचे उद्घाटन करावे असे मला वाटते. त्यामुळे वडीलधाऱ्या माणसांना ध्यावयात ही आपणास कोणीतरी मान देते आहे ध्या विचाराने त्यांच्या जीवनातील पोकळी कमी होईल. हे विचार सांगत असतानाच टाळ्यांचा इतका कडकडाट झाला. की आता थांबा म्हणुन सांगायची वेळ आली. यावरुन ही गोष्ट सगळ्यांना पटली हे सिध्द झाले.

सागरने आज स्वःताचा नवीन उद्योग सुरु केला आहे. तो ही आपल्याच गावात याचा मला फार अभिमान वाटतो आहे. "ज्ञान हा एक खजीना आहे. पण प्रत्यक्ष आचरण करणे हे त्याचे गुढ उकलणारी गुरु-किल्ली आहे. आपल्या हृदयात ज्याक्षणी आपल्या जवळील खजिन्याची असते हेच क्षण आपण खऱ्या अर्थाने जगतो असे आपणास म्हणता येईल". त्याला त्याच्या उद्योगास चांगले यश मिळू दे, छान भरभराट होउ दे. अशा त्याला मी शुभेच्छा देतो.

कोणतेही काम करताना अडचणी ध्या येणारच, त्यावर मात करत आपण पुढे जायचे असते. "समस्या नाही असा मनुष्य नाही, पण उपाय नाही अशी समस्याही नाही." पुन्हा एकदा मनापासुन "शुभेच्छा"

काकांनी आपल्या अमुल्य वेळ माझ्यासाठी दिला त्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो. आपण ही सर्वजण आलात त्याबद्दल सर्वांचे आभार मानतो. आता आपण सर्वांनी जेवणाचा आस्वाद ध्यावा. अशी सागरने सर्वांना विनंती केली.

भोजनाची सर्व तयारी होतीच. पंगत बसली. सागरचे बाबा, सुहास आनंदला बोलवायला आले. चला, चला म्हणत सर्वजण जेवायला बसले. गरम, गरम मसालेभात, वरण भात सर्वजण जेवणात गुंग होते. पाठोपाठ जिलबीची ताट आली. जिलबीचा तुकडा मोडून तोंडात घालणार तेवढ्यात आनंदचे लक्ष दाराकडे गेले. दारात एक बाई मुलाला कडेवर घेऊन जिलबीच्या ताटाकडे आशाळभूत नजरेने पहात होती. ते पाहून आनंदचा घास हातातच राहिला. त्या बाईच्या जागी त्याला त्याची आई दिसत होती. सागरची आई जिलबीचा आग्रह करत होती. पण आनंदचा चेहरा बघून त्यांना काही समजेचना, तेवढ्यात सागरचे बाबा आले.

—x—

2

त्यांनी आनंदची नजर ओळखली. त्यांनी त्या बाईस आत बोलाविले. आणखीही काही लोक होते, सर्वांची एक पंगत बसविली. ते दृष्य पाहून आनंदच्या चेहऱ्यावरचे भाव थोडे बदलले. सर्वजण जेवला, जेवता कार्यालयाच्या भविष्याच्या गोष्टी करत होते. पण आनंद मात्र आपल्या भूतकाळाचा विचार करत होता.

आनंद पहिलीत होता तेव्हा एका मुलाने डब्यातून जिलबी आणली होती. त्याने घरी आल्यावर आईला फक्त सांगितले, आई आज राजूने डब्यात जिलबी आणली होती. ते ऐकून आईचा चेहरा उतरला. बाळा मी पण तुला उद्या डब्यात जिलबी देईन हं. असे आईने आनंदला सांगितले. पण अग आई मला जिलबी आवडतच नाही. मी तुला सहज सांगितलं. तू काही मनाला लावून घेऊ नकोस.

रात्री उशिरा आनंदचे बाबा कामावरून घरी आले. आईने त्यांना जिलबी विषयी सर्व सांगितले. बाबा म्हणाले उद्या मी थोडी त्याच्या पुरती जिलबी आणीन. कस आणणार हो तुम्ही? किती महाग आहे. त्यापेक्षा मी उद्या शहाच्या लग्नाची भांडी घासायला जाणारच आहे. तिथून थोडी जिलबी मागुन आणिन. कोणापुढे हात पसरणे ही गोष्ट त्याच्या मनाला पटत नव्हती. पण परिस्थितीपुढे नमत घ्याव लागत होत.

दुसरे दिवशी बाबा कामावर गेले, आनंद शाळेत गेला. आई भांड्याला गेली. आनंदच्या नकळत आई भांडी घासायला जात असे. मांडवाबाहेर उरलेले अन्न लोकांना वाटत होते. नेमकी त्याच दिवशी आनंदची शाळा लवकर सुटली. मांडवातील गर्दी पाहून तो तिथंच बघत उभा होता. अन्न वाढणारा खसाखसा ओरडत होता. पोटापुढे कोणाचे त्या ओरडण्याकडे लक्षच नव्हते. त्याने जिलबी फेकली. ती एका बाईने आपल्या पदरात झेलली. ती बाई म्हणजे दुसरी-तिसरी कोणी नसुन आनंदची आई होती. ते बघुन त्याला धक्काच बसला. तो आईजवळ येऊन रडू लागला. आई मला जिलबी नको. ती जिलबी त्याने दुसऱ्याला द्यायला लावली. तो घरी परतला त्यानंतर त्याने गोड खाणेच बंद केले. आईजवळ कोणताही हट्ट केला नाही. लहान वयातच [redacted] मला खूप समज आली. आपल्या आई-बाबांना खूप सुखात ठेवायच असा मी निश्चय केला. त्यानंतर मात्र मी जी भरारी घेतली मग मागे वळून पाहिलच नाही.

ठरवल्याप्रमाणे अभ्यास जोरात सुरु केला. आईला प्रत्येक कामात

3

मदत करत होतो. शाळेतल्या प्रत्येक स्पर्धेत भाग घ्यायचा व ती स्पर्धा जिंकायचीच असे सुरू झाले. सकाळच्या वेळी पेपर टाकणे, त्या पैशातून आईला जुने शिवणयंत्र घेतले. त्यामुळे आई भांडी घासायला न जाता शिवणकाम करू लागली. त्यावेळी मी कपड्यांना काज-बटण लावायला मदत करू लागलो. लहान वयातली माझी समज, हुषारी बघुन बरेचजण आई-बाबांचे नाव तू उज्वल करणारे असे म्हणु लागले. अभ्यासा बरोबर खेळ, पोहणे, वक्तृत्व स्पर्धेतही भाग घेउन बक्षिस मिळविली. आवाजाची देणगी होतीच. गाणी चांगली म्हणु लागलो. काही नाटकात बालकलाकारांचे काम केले. सर्व बक्षिसांच्या पैशामुळे आईला घर खर्चात मदत होउ लागली. शाळेचा सर्व खर्च शिष्यवृत्तीवर चालत होता. गरीब-होतकरू विद्यार्थी म्हणुन शाळेचा युनिफॉर्म, वह्या, पुस्तके शाळेकडून मिळत होती.

बघता, बघता शिक्षण पूर्ण झाले. चांगल्या मार्कांने इंजिनियर झालो. दुसरीकडे नोकरीस जाण्यापेक्षा आपल्याच गावात काहीतरी उद्योग सुरू करायचा असे माझ्या मनात होते. त्यामुळे गावातल्या तरूण पिढीला नोकऱ्या मिळतील. हा सर्व विचार करून, बॅंकेचे कर्ज काढून M.I.D.C मध्ये जागा घेउन छोटासा कारखाना काढला. आई-बाबांच्या हस्ते उद्घाटन केले. हळूहळू कामाचा व्याप वाढला. गावातील गरीब, गरजु लोकांना कामावर घेतले. व्यसनी लोकांना कामावर प्रवेश नव्हता. त्यामुळे बरेचजण व्यसन-मुक्त झाले.

चांगले शिक्षण, छान उंचीबांधा, आर्थिक स्थिती चांगली, निर्व्यसनी त्यामुळे खूप वधुपिते लग्नासाठी मागे लागले होते. अजुन वर्षभर लग्न करणार नसल्याचे जाहीर केले. बाबांचे मित्र अशोककाका त्यांना चार मुली होत्या. त्यांची परीस्थितीही आमच्या सारखी सर्वसाधारणच होती. त्यातूनही त्यांनी जशी जमेल तशी आम्हाला खूप मदत केली होती. त्यांची मोठी मुलगी "अंजली" लग्नाची होती. तिच्याशी मी लग्न करेन असे आई-बाबांनां सांगितले. त्यांना खूप आनंद झाला. त्यांनी ही बातमी लगेच अशोक-काकांनां सांगितली. त्यावर त्यांचा विश्वासच बसत नव्हता. ते म्हणाले, "काय राव गरीबांची चेष्टा करताय." तुमी कुठ आमी कुठ.

तस काही नाही रे बाबा. आमची खूप इच्छा होतीच. ती आनंदला सांगायच्या आत त्यानेच हे आम्हाला सांगितले. अशोककाकांनी ही बातमी त्यांच्या घरी सांगितली, त्यांच्या घरीही सर्वांनां खूप आनंद झाला. त्यांनी अंजलीला विचारले, काय ग तुला आनंद कसा वाटतोय. ती लाजली. त्यात सर्व आले. कारण नाही म्हणण्याच काही कारणच नव्हत. तिनेही

4

होकार दिला. मग मी तिला भेटायची इच्छा व्यक्त केली. तसे आमचे येणे-जाणे होतेच. पण ही भेट फक्त वेगळीच होती. अंजली बी. कॉम झाली होती. अभ्यासात खूप हुषार होती. एका सी. ए. कडे नोकरी करत होती. रहाणीमान खूप साधे. दिसायला सुंदर. शिवणकाम चांगले येत होते. मुख्य म्हणजे मिळून मिसळून स्वभाव.

दोघांची भेट झाली. गप्पा, टप्पा झाल्या. आपण साध्या पध्दतीने लग्न करू. मला छानछोकीची फारशी आवड नाही. तुला काय सगळं माहीतच आहे. तुझं काय म्हणणं असेल तर तसं सांग.

ती काहीच बोलली नाही. मी घातलेली लग्नाची मागणीच तिला खूप अनपेक्षित होती. हो चालेल, आपण साध्या पध्दतीने लग्न करू. फक्त लग्नानंतर थोडे दिवस मी नोकरी करीन कारण माझ्या शिक्षणासाठी काढलेलं कर्ज अजुन बाकी आहे. बाकीच्यांची शिक्षणं अजुन व्हायची आहेत. तेवढीच बाबांना मदत.

बाकीच्यांच्या शिक्षणाची, लग्नाची, काकाच्या कर्जाची तू अजिबात काळजी करू नकोस. आता ते सगळं मी बघुन घेईन. बाबा, काकांच्या मैत्रीचं रुपांतर आता नात्यात होणार आहे. त्यामुळं दोन्ही घरांची सुख-दुःख आपलीच आहेत.

आमच्या लग्नाबरोबर गावातल्या अकरा जोडप्यांची लग्न एकाच वेळी अत्यंत साधेपणाने पार पडली. सर्वजण खूपच आनंदात होते.

अंजली खूप समंजस असल्याने आई-बाबांची खूप काळजी घेत होती. नोकरी सोडून तिने शिवणकाम जोरात सुरु केले. गावातील बायकांना शिवण शिकविले. नविन मशीन घेउन त्यांना काम दिलं. बायकांच्या हातीचार पैसे येऊ लागले त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला.

महिलांचा बचत गट सुरु केला. ज्यांच्या अंगात जी कला आहे त्यांनी ते करून स्वःताच्या पायावर उभे रहाव असा सल्ला दिला. त्यासाठी मदतीचा हातही पुढे केला. त्यामुळे बायकांच्यात उत्साह वाढला. कोणी शिवणकाम, विणकाम, भरतकाम, मसाले पापड, कुरडया, सांडगे, हे उद्योगही वाढले. अंजलीच्या पायगुणाने कारखान्याच्या कामातही भरभराट झाली.

माझे व अंजलीचे आई-बाबा मिळून काशीयात्रा करून आले. सर्वजण खूप आनंदात व सुखात होते.

—×—

5


कारखान्याच्या कामाला खूप प्रसिध्दी मिळत होती. नेहमी वेगवेगळे प्रयोग सुरु होते. मला बाहेरच्या देशातून बोलावणे येत होते. पण मी ते साफ नाकारले. मी माझ्या देशासाठीच काम करीन. मला इथे रहाण्यातच पूर्ण समाधान आहे. माझी सर्व हुषारी माझ्या देशबांधवांच्याच कामी येईल.

" मेरा भारत महान " हे माझे ब्रिद वाक्य आहे.



कथा-रमा परांजपे-

व्हिडिओ पहा



6